महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६  फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org  Website - www.mchmumbai.org


.................................................................................................................

क्र. महोप-अस्था-२०१३  दि. ६ मे २०१३

सूचना

महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेतर्फे दि. ३१.१२.२००७ पर्यंतच्या (क्र. ४४२०० पर्यंत) नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांचे नुतनीकरण कार्यक्रम पूर्ण केला असून ज्यांनी नुतनीकरण केले नाही, अशांची नावे बीएचपी ॲक्ट १९५९ च्या कलम २६ नुसार कसूरदार असल्याने त्यांची नावे परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहेत. तसेच त्यांना प्रत्यक्ष पोस्टाने नोटीसही पाठविण्यात आली आहे. अशा कसूरदारांनी दि. १५ मे नंतर संकेतथळावरील यादी तपासून आपले नाव पुर्नःनोंदणी करण्याबाबतची प्रक्रियेची माहिती घेण्याकरिता परिषदेशी संपर्क साधून दि. १५ जून २०१३ पर्यंत आपली नावे पुर्नःनोंदणी करुन घ्यावी. तदनंतर परिषदेची निवडणूक यादी तयार करण्यात येईल. दि. १५ जून २०१३ नंतर परिषदेस प्राप्त झालेल्या पुर्नःनोंदणी अर्जांच्या अनुषंगाने पुर्नःनोंदणी केली जाईल परंतु अशा व्यावसायिकांचा मतदार यादीत समावेश केला जाणार नाही. ज्यांनी यापूर्वी अर्ज केलेले आहेत व त्यांना नुतनीकरण करुन मिळाले नाही किंवा त्यांचे नावे कसूरदार यादीत असेल तर त्यांनी त्वरित परिषदेशी संपर्क साधावा व त्रुटीचे निराकरण करुन नुतनीकरण करुन घ्यावे.

बी.एच.पी. ॲक्ट १९५९ (सुधारित कायदा २०११) अन्वये आता प्रत्येक नोंदणीकृत होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाला त्याच्या नोंदणीच्या तारखेपासून पाच वर्षे पूर्ण होतील त्याच्या २ महिने अगोदर आपले नाव नुतनीकरण करुन घ्यावयाचे आहे, तसे न केल्यास त्यांना कसूरदार घोषित करण्यात येईल.

परंतु दि. ३१.१२.२००७ नंतर दि. ३० सप्टेंबर २००८ पर्यंत (क्र. ४६२६१ पर्यंत) ज्यांची नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक म्हणून या परिषदेकडे नोंद आहे, त्या सर्वांनी आपल्या नोंदणीचे नुतनीकरण त्वरित करुन घ्यावे. अन्यथा त्यांना कसूरदार म्हणून घोषित करण्यात येईल. तसेच सप्टेंबर २००८ नंतर नोंदणी केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांनी आपल्या नोंदणीच्या तारखेपासून दर पाच वर्षांनी दिलेल्या तारखेच्या दोन महिने अगोदर आपले नाव नुतनीकरण करुन घ्यावयाचे आहे. यापुढे परिषदेतर्फे कोणतीही वैयक्तिक नोटीस वैद्यकीय व्यावसायिकाला पाठविणे बंधनकारक नाही, याची नोंद घ्यावी. तसेच ज्यांनी एम.डी.(होमिओपॅथिक) अर्हता उत्तीर्ण केली आहे अशा व्यावसायिकांनी आपल्या अतिरिक्त अर्हतेची नोंदणी रजिस्टरमध्ये योग्य ती फी भरुन नोंद करुन प्रमाणपत्र प्राप्त करावे.

(वि. क. थानवी)
प्रभारी प्रबंधक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई १

ठिकाण - मुंबई
दिनांक - ६ मे २०१३